# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे "आयडॉल्स"

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "कृषि पदवीधर आयडॉल"

### श्री. बाबासाहेब विठ्ठल भोसले

कृषि उद्योजक, कृषि पदविका (१९९३-९५), मफुकृवि, राहुरी, कृषि विद्यालय, पुणतांबा
मु. बिरेवाडी, पो. मांडवे (बु.), ता. संगमनेर, जि. अहमदनगर




संपर्क क्र. : ९५५२५५१४५१

**कृषि उद्योगांची माहिती**

- श्री बालाजी कृषि सेवा केंद्र - २००२
- श्री बालाजी हायटेक नर्सरी - २००३
- श्री बालाजी कृषि सेवा केंद्र, टाकळी ढोकेश्वर - २००९
- श्री बालाजी मशिनरी व ॲग्रोमॉल - २०१३
- श्री बालाजी कलेक्शन - २०१५
- व्यंकटेश्वर स्पेशालिटी फर्टीलायझर (इं.) प्रा. लि., पुणे - २०१७
- मुळा प्रवरा फार्मर प्रोड्युसर कंपनी - २०१८
- ग्रीनपर्ल इंडस्ट्रीज - २०२०

**उद्योगामधील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान**

- भारतातील पहिल्या भाजीपाला रोपवाटीकेमार्फत अहमदनगर जिल्ह्यामध्ये कोकोपीट-ट्रे मधील तयार रोपांची विक्री
- सन २००५ मध्ये १ कोटी रोपांची निर्मिती व विक्री
- आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत शेतीचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन
- रासायनिक खतांमुळे दुषित झालेल्या जमिनी सुधारण्यासाठी ऑरगॅनिक फर्टीलायझर्स कंपनीची स्थापना
- ऑरगॅनिक स्पेशालिटी फर्टीलायझर्समधून खतांचा पुरवठा
- सेंद्रिय उत्पादनाचा सुवर्णभूमी हा स्वतःचा ब्रॅण्ड विकसीत
- दाणेदार सेंद्रिय खताचे १०० टक्के ॲटोमेशनने उत्पादन




**वार्षिक उलाढाल : सन २०२१-२२ रु. २५ कोटी**

**सामाजिक क्षेत्रातील योगदान**

- दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी ठिबक व तुषार सिंचनाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन
- शेतीमध्ये ठिबक सिंचन, अत्याधुनिक मशिनरी, सेंद्रिय शेती, पिकांची फेरपालट, माती पाणी परिक्षण या विषयावरील पुणे, नाशिक, सातारा या भागामध्ये स्वखर्चाने शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्लॉट पाहणीसाठी घेऊन जातात
- परिसरातील शेतकऱ्यांना एकत्र करुन मुळा प्रवरा फार्मर प्रोड्युसर कंपनीची स्थापना

**रोजगार निर्मिती**

- बालाजी ग्रुपमध्ये ९० कायमस्वरुपी कर्मचारी व २५ ते ३० हंगामी कर्मचारी काम करतात












## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "शेतकरी आयडॉल"

### कृषिरत्न डॉ. संजीव गणपतराव माने

### सौ. श्री संजीव माने

मु. पो. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली



संपर्क क्र.: ९४०४३६७५१८

**शिक्षण** : बी. ए., ऑनररी डॉक्टरेट

**जमीनधारणा क्षेत्र** : ३.५ हे.

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**

**उसाची पंचसुत्री**

- जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी उभी आडवी नांगरट, कुळवणी, कंपोस्ट खत १५ टन व जिवाणूंची ३ वेळा आळवणी
- ऊस लागणीची योग्य पध्दत ५ फुटी सरी, एक डोळा, बीजप्रक्रिया करुन सरीत आडवे दिड फुटांवर लागण
- माती परिक्षणानुसार रासायनिक खते, नत्र २८० किलो, स्फुरद १५० किलो, पालाश १५० किलो, सुक्ष्म अन्नद्रव्ये ३० किलो, गंधक ३० किलो, मॅग्नेशिअम सल्फेट ५० किलो, कॅल्शिअम ५० किलो प्रति एकर
- पाण्याचे व्यवस्थापन - थोडे थोडे पाणी सारखे सारखे पाणी या सुत्रानुसार ठिबक सिंचनाने मोजून पाणी
- पीक संरक्षण - वन्य प्राण्यांपासुन संरक्षण, रोग, किड आणि बुरशींपासुन संरक्षण, पीजीआरच्या फवारण्या

**वार्षिक उत्पन्न : शेतीमधुन - रु. ५० लाख**
**ऊस रोपवाटीका - रु. १ कोटी**

**तंत्रज्ञानाचा प्रसार**

- महाराष्ट्रासह विविध राज्यात २४०० पेक्षा अधिक व्याख्यानांव्दारे तंत्रज्ञानाचा प्रसार
- व्हाट्सअॅप ग्रुपव्दारे आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञानाचा प्रसार
- गुजरात, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील ८ साखर कारखान्यांवर सल्लागार म्हणुन गेली ७ वर्षे कार्यरत
- उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, हरीयाणा, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडु येथे अभ्यास दौरे

**परदेश दौरे व राष्ट्राध्यक्षांशी चर्चा**

- इस्त्राईल, अमेरिका, लंडन, मॉरीशस येथे अभ्यास दौरे
- अमरिकेचे तत्कालीन मा. राष्ट्राध्यक्ष श्री. बराक ओबामा यांचेशी भेट आणि ऊस पीक व ठिबक सिंचन या विषयावर चर्चा

**विविध पुरस्कारांनी सन्मानित**

- कृषिरत्न, कृषिभुषण आणि शेतीनिष्ठ शेतकरी, महाराष्ट्र शासन यांचे एकूण ६४ पुरस्कार

















## विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

नोव्हेंबर, २०२२